संगणक परिक्षा उत्तीर्ण होण्यामधून सुट देणेबाबत.

जिल्हा परिषद अहमदनगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्रमांक.साप्रवि-२/आस्था-३/२७२४/७४७/२०२४ /1638
अहमदनगर दिनांक :- 06/06/२०२४

वाचा :- १. महा.शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रं.सेप्रनि-२००२/प्र.क्र.१४/०२/ २०१२ दि.०२ सप्टेंबर २००३
२. महा.शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रं.मातंसं/नस्ती-०४/२२४/३९ दिनांक ०५ मे २००७
३. मा.मु.का.अ.जि.प.अ.नगर यांचेकडील अधिकार प्रदान आदेश क्रं.साप्रवि-१/र.व.का/६९६/ २०१६ अ.नगर.दि.१७/०६/२०१६ (५८)
४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड यांचेकडील पत्र जा.क्र.वशि/आस्था-१/६६६ दिनांक ३०/०४/२०२४

शासनाचे उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय क्रं. ०१ व ०२ अन्वये शासकिय सेवकांनी /कर्मचा-यांनी दिनांक ३१/१२/२००७ पर्यंत संगणक परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक होते, परंतु खालील नमूद कर्मचारी हे दिनांक ३१/१२/२००७ पर्यंत संगणक परीक्षा उत्तीर्ण झालेले नाहीत. उक्त संदर्भ क्रं.४ अन्वये खालील प्रमाणे नमुद कर्मचारी यांना संगणक परिक्षा पास प्रमाणपत्र सादर करण्यापासुन सुट मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

वरील संदर्भीय शासन निर्णयात नमुद केलेल्या तरतुदीच्या अधिन राहून व संदर्भ क्र.३ नुसार मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार मी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा), जिल्हा परिषद अहमदनगर खालील कर्मचारी यांचे वय खालील रकाना क्रं.०६ मधील दिनांकास ५० वर्षे पुर्ण झालेमुळे त्यांना संगणक परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रमाणपत्र सादर करणेपासून रकाना क्र.०७ मध्ये दर्शविलेल्या दिनांकापासून सुट मंजुर करीत आहे.

| अ क्र | कर्मचा-याचे नाव | हुद्दा | कार्यालय | जन्मतारीख | वयाची ५० वर्ष पुर्ण झाल्याचा दिनांक | संगणक परिक्षा उत्तीर्ण होणेपासून सुट दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | श्री पुराणे गौतम विश्वानाथ | कनिष्ठ सहाय्यक | पं.स जामखेड | २५/०५/१९६६ | २४/०५/२०१६ | २५/०५/२०१६ |

संदर्भ क्रमांक २ च्या शासन निर्णयानुसार जे कर्मचारी दिनांक ३१/१२/२००७ पर्यंत संगणक परिक्षा पास होणार नाहीत, अशा कर्मचा-यांच्या पुढील वेतनवाढी थोपविण्यात येवून वेतनवाढी अदा केल्या असल्यास त्याबाबत वसुली करणेत यावी व तशी नोंद मुळ सेवा पुस्तकात घेणेत यावी. तसेच सेवानिवृत्त वेतन प्रकरण सादर करतेवेळी सदर मुळ सेवा पुस्तकाची नोंदीची छायांकित प्रत सादर करणेत यावी.

उपरोक्त नमुद कर्मचारी यांना वयाची ५० वर्ष पुर्ण झाल्यामुळे संगणक परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून या आदेशान्वये सूट मंजूर करण्यात येत असून सदरचे आदेशाची नोंद संबधीतांचे मूळ सेवा पुस्तकामध्ये घेण्यात यावी.

सदरचा आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रं.202406060400056 असा आहे.

Signed by Rahul Ashok Shelke
Date: 06-06-2024 14:03:27

(राहुल शेळके)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,
श्री पुराणे गौतम विश्वानाथ, कनि सहा, गट विकास अधिकारी,पंचायत समिती जामखेड
द्वारा - गट विकास अधिकारी,पंचायत समिती जामखेड
प्रत:- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर